*चंद्रपूर , मुल , पोंभुर्णा , बल्लारपूर तालुक्यातील 10 गावांमध्ये स्व सुषमा स्वराज महिला उद्योग भवन बांधणार*
*अर्थमंत्री सुधीर मुनगंटीवार यांची स्व. सुषमा स्वराज यांना आदरांजली*
*6 कोटी रु. निधी मंजूर , शासन निर्णय निर्गमित*
==============================================================

महिला बचतगटांची चळवळ अधिक गतिमान व्हावी व बचतगटांद्वारे उत्पादित वस्तुंना बाजारपेठ उपलब्ध व्हावी या दृष्टीने अर्थमंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्या पुढाकाराने चंद्रपूर , मुल , पोंभुर्णा आणि बल्लारपूर तालुक्यात प्रत्येकी 60 लक्ष रु किंमतीचे 10 महिला उद्योग भवन बांधण्यात येणार आहे. हे महिला उद्योग भवन ज्येष्ठ नेत्या दिवंगत सुषमा स्वराज यांच्या स्मृतीस समर्पित करण्यात येणार आहे. दि. 5 सप्टेंबर रोजीच्या शासन निर्णयान्वये यासाठी 6 कोटी रु निधी मंजूर करण्यात आला आहे.

चंद्रपूर तालुक्यातील उर्जानगर , दुर्गापूर , चिचपल्ली , नागाळा ( म ) येथे , बल्लारपूर तालुक्यातील कोठारी आणि बामणी येथे , पोंभुर्णा तालुक्यातील नवेगाव मोरे येथे तर मूल तालुक्यातील चिरोली , दाबगाव , चिचाळा येथे स्व. सुषमा स्वराज महिला उद्योग भवन बांधण्यात येणार आहे . अर्थमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी महिला बचतगटांची चळवळ अधिक गतिमान व्हावी यासाठी यावर्षीच्या अर्थसंकल्पात प्रज्वला योजना , तेजस्विनी योजनांसाठी भरीव आर्थिक तरतूद केली आहे .

गेल्या 5 वर्षात अर्थमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी महिलांसाठी अर्थसंकल्पात अनेक योजना घोषित केल्या आहेत . प्रामुख्याने दारिद्रय रेषेखालील व दारिद्रय रेषेवरील मुलींसाठी माझी कन्या भाग्यश्री योजना, ग्रामीण भागातील अंगणवाडया आदर्श करण्याचा निर्णय, अंगणवाडी सेविका, मिनी अंगणवाडी सेविका व मदतनिस यांना प्रधानमंत्री जीवनज्योती विमा योजना व प्रधानमंत्री सुरक्षा विमा योजना यात समाविष्ट करण्यासाठी विम्याच्या हफ्त्यापोटी लागणारी रक्कम राज्य शासनाकडून अदा करण्याचा निर्णय, राज्यातील कुपोषणाच्या समस्येवर मात करण्यासाठी आदिवासी क्षेत्रातील 16 जिल्हयांसाठी तसेच बिगर आदिवासी क्षेत्रातील अतितिव्र कुपोषीत बालकांसाठी ग्राम बालविकास केंद्र सुरू करण्याचा निर्णय, राज्यात सध्या कार्यरत असलेली 33 अल्पमुदती निवासगृहे व 53 स्वाधारगृहे एकत्रित करून संकटग्रस्त महिलांसाठी स्वाधारगृहे ची नविन योजना, राज्यातील अंगण्वाडी सेविका व मदतनिस यांच्या मानधनात तसेच भाऊबीज भेट रकमेत वाढ करण्याचा निर्णय , अंगणवाडी सेविकांना भ्रमणध्वनी उपलब्ध करून देण्याचा निर्णय, नारीशक्तीचा सन्मान व आदर करत महिलांचे सक्षमीकरण व त्यांना आत्मनिर्भर करण्यासाठी महिला बचतगटांनी उत्पादीत केलेल्या वस्तुंच्या विक्रीसाठी जिल्हास्तरावर कायमस्वरूपी पुण्यश्लोक

अहिल्याबाई होळकर बाजारपेठ निर्माण करण्याचा निर्णय, महाराष्ट्रातील सर्व मुलींच्या शासकीय वसतीगृहांना संरक्षक भिंत बांधण्याचा निर्णय, ग्रामीण महिलांचा जीवनस्तर उंचावत त्यांच्या उद्यमशीलतेला वाव देत प्रगतीचा नविन टप्पा त्यांच्या आयुष्यात यावा यासाठी नवतेजस्विनी योजना राबविण्याचा निर्णय, या माध्यामतुन राज्यातील 5 लक्ष बचतगटांची चळवळ अधिक गतीमान करण्याचा प्रयत्न , राज्यातील सर्व महिला बचतगटातील महिलांची कायदेविषयक, सामाजिक, आर्थिक ज्ञानाबाबत जनजागृती करण्याकरिता महाराष्ट्र महिला आयोगामार्फत नविन प्रज्वला योजना राबविण्याचा निर्णय,राज्यातील अल्पसंख्यांक समाजातील महिलांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी विशेष कौशल्य विकास कार्यक्रम राबविण्याचा व रोजगार उपयोगी साहीत्य देण्याचा निर्णय ,संजय गांधी निराधार योजना, श्रावणबाळ योजना या योजनांच्या माध्यमातुन विधवा, परित्यक्ता, घटस्फोटिता, दिव्यांग महिलांना मिळणा-या अनुदानाच्या रकमेत रू 600 वरून 1000 रू. इतकी वाढ करण्याचा निर्णय, दोन अपत्ये असणा-या लाभार्थ्यांना 1200 रूपये अनुदान देण्याचा निर्णय, विधवा, परित्यक्ता, घटस्फोटित महिलांना आधार देणे व त्यांना स्वयंपूर्ण तसेच स्वावलंबी बनविण्यासाठी स्वयंरोजगाराची योजना तयार करण्याचा निर्णय, यासाठी पहिल्या वर्षी 200 कोटी रू. निधी राखुन ठेवण्याचा निर्णय ,सुमतीबाई सुकळीकर उद्योगिनी महिला सक्षमीकरण योजना, नव्याने शासनसेवेत रूजु झालेल्या महिला कर्मचा-यांना प्रसुती रजा देण्याचा निर्णय,विधवा महिलेने पुनर्विवाह केल्यानंतर मयत पतीची पेंशन तिला लागू करण्याचा निर्णय, शेतक-याच्या घरी मुलगी जन्माला आल्यास त्या शेतक-याला 5 सागाची व 5 फळ झाडांची रोपे देण्यासाठी कन्या वनसमृध्दी योजना अशा विविध योजना व निर्णय त्यांनी घेतले आहे.

स्व. सुषमा स्वराज महिला उद्योग भवनाच्या माध्यमातून महिला बचतगटांची चळवळ अधिक सक्षम करण्यासाठी अर्थमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी घेतलेला पुढाकार ज्येष्ठ नेत्या सुषमा स्वराज यांच्या कर्तृत्वाचा सन्मान करत त्यांना अभिवादन करणारा आहे.